* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

दिनांक :- ०६/०७/१९

## वाशिम जिल्हा पोलीस दलाचा 'ईद मिलन उपक्रम'

सामाजिक सलोखा कायम ठेवायचा असेल तर सर्व धर्मियांनी एकमेकांच्या धर्माविषयी आदर बाळगला पाहिजे, असे प्रतिपादन अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरिक्षक मकरंद रानडे यांनी केले. वाशिम जिल्हा पोलीस दलाच्या वतीने शुक्रवार दिनांक ०५/०७/१९ रोजी वाटाणे लॉन येथे आयोजित **'ईद मिलन'** कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी हषीकेश मोडक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिपक कुमार मीना, जिल्हा पोलीस अधिक्षक वसंत परदेशी, अपर पोलीस अधिक्षक विजयकुमार चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री. मकरंद रानडे म्हणाले, काही वर्षापुर्वी घडलेल्या अप्रिय घटनांमुळे वाशिम हा संवेदनशील जिल्हा समजला जात होता पण सध्या जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था तसेच जातीय सलोखा चांगला आहे. आगामी काळात होणाऱ्या गणेशोत्सव, मोहरम,दुर्गा उत्सव तसेच विधानसभा निवडणुकांमध्ये जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था तसेच जातीय सलोखा कायम राखण्यासाठी सर्व जाती धर्मातील प्रतिष्ठीत व्यक्तीनी पुढाकार घ्यावा व पोलीस दलाला सहकार्य करावे. ईद मिलनसारख्या कार्यक्रमांमुळे सर्व धर्मीय एकत्र येवुन सामाजिक सलोखा वाढण्यास मदत होते. त्यामुळे दिवाळीच्या सणामध्ये सुध्दा सर्वधर्मियांना एकत्र आणणारा असाच कार्यक्रम आयोजित करावा, असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी श्री. मोडक म्हणाले, ईद मिलन कार्यक्रमामुळे जिल्हयातील जातीय सलोखा कायम राहण्यास मदत होईल. . जिल्हयात सध्या सौहार्दाचे वातावरण असुन यापुढेही ते कायम रहावे, असे आवाहन त्यांनी केले.

पोलीस अधिक्षक श्री. परदेशी म्हणाले, भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. या देशात वास्तव्य करणाऱ्या प्रत्येकाचा धर्म हा शांततेचा संदेश देणारा आहे. हिंसाचार,असमानता याला कोणत्याही धर्मात थारा नाही. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने स्व:ताचे धर्माचे पालन केले तर देशातील सलोखा कायम राहिल. मात्र काही समाजकंटक जाणीवपुर्वक सामाजिक व जातीय तेढ निर्माण करुन सामाजिक शांततेला बाधा पोहचवतात. त्यामुळे समाजाचे मोठे नुकसान होते. ज्या देशात शांतता, कायदा व सुव्यवस्था चांगली आहे, तेथेच उदयोग, व्यवसायाचा विकास होतो व रोजगार उपलब्ध होतो. त्यातुन देशाची व समाजाची प्रगती होते. त्यामुळे सर्वांनी जातीय वाद, धार्मीक वादाला तिलांजली देऊन बंधुभाव जोपासावा, असे आवाहन करुन श्री परदेशी म्हणाले, सर्व समाज बांधवाना एकत्र आणुन त्यांच्यामध्ये आपलुकी, आत्मीयता निर्माण करण्यासाठीच ईद मिलन हा उपक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. यावेळी त्यांनी खऱ्या ईस्लाम धर्माची शिकवण काय आहे याबाबत उपस्थितांना माहिती दिली.

प्राध्यापक जिया अहमद खान, प्रा. अब्रार मिर्झा, मौलाना अन्सार यांनी इस्लाम व कुराण याविषयी मार्गदर्शन केले. तसेच सर्व धर्मीयानी परस्परांशी बंधुभाव कायम ठेवावा असे आवाहन केले. यावेळी पोलीस अधिकारी/कर्मचारी, शांतता समिती व मोहल्ला समिती सदस्य, पत्रकार व विविध जाती धर्मातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शमीम फरहत यांनी केले, तर आभार अपर पोलीस अधिक्षक श्री. चव्हाण यांनी मांडले.

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम